७९०९

**पत्र**

जा.क्र/ drone tech./गुनि-५/न.क्र.१५२/ /२०२१
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
दिनांक: २८/०२/२०२२

**प्रति,**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**सर्व**

**विषय : कृषि यांत्रिकीकरण उप अभियान (SMAM) अंतर्गत ड्रोन खरेदीसाठी अनुदान मिळणे करीता अर्जाचा नमुना**

**संदर्भ: केंद्र शासनाचा O.M. क्र. F.No.3-4/2020-M&T (I & P)(81291) दि. १७ जानेवारी २०२२ अन्वये ड्रोन वापरासंबंधी मार्गदर्शक सूचना**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, केंद्र शासनाचे वरील संदर्भीय पत्र दि. १७ जानेवारी २०२२ अन्वये शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणी च्या सेवा व सुविधा उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या https://farmech.dac.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये दिलेल्या प्रसिद्धी च्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरून अर्ज करावयाच्या पद्धती बाबत विचारणा करण्यात येत आहे. यास्तव ड्रोन खरेदीसाठी अनुदान मिळणे करीता अर्जाचा नमुना सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.याबाबत आपले स्तरावरून क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांना अवगत करावे.

**सोबत:** वरीलप्रमाणे

**( दिलीप झेंडे )**
**कृषि संचालक ( नि. व गुनि. )**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१**

**प्रत: वि.कृ.स.स.(सर्व) यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव**

<u>अर्जाचा नमुना — ड्रोन खरेदी साठी अनुदान मिळणेकरीता अर्ज'</u>

**कृषि यांत्रीकीकरण उपअभियान सन 2021-22 अंतर्गत**

**घटक क्र ४ : ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र स्थापनेसाठी अर्थसहाय्य**

प्रति,

मा.संचालक
निविष्ठा व गुण नियंत्रण
कृषी आयुक्तालय,पुणे
द्वारा — जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
............................

**विषय :- कृषि यांत्रीकीकरण उपअभियान सन २०२१-२२ मधील घटक क्र.-४ “ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र स्थापनेसाठी अर्थसहाय्य'' योजनेचा लाभ मिळणेबाबत...**

महोदय,

मी/आम्ही उपरोक्त विषयामध्ये नमुद केलेप्रमाणे आपलेकडील कृषि यांत्रीकीकरण उपअभियान सन २०२१-२२ अंतर्गत घटक क्र.४: अंतर्गत **“ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र स्थापनेसाठी अर्थसहाय्य**''या घटकाचा कृषि यांत्रीकीकरण उपअभियान मधून लाभ घेवु इच्छित आहे. सदर योजनेच्या अनुदानातून शासनाने निश्चित केलेल्या नियमानुसार अर्जामध्ये नमुद केलेल्या ड्रोन उपकरणाच्या खरेदीकरीता पुर्वसंमती मिळावी व अनुदान उपलब्ध होवून मिळावे, ही विनंती.

**१. अर्जदाराची माहिती :**

| | |
|---|---|
| **१. अर्जदार संस्थेचे नांव:** | |
| **२. अर्जदाराचा प्रकार** (लागु असलेल्या ठिकाणी √ खूण करावी.) | शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतक-यांची सहकारी संस्था / ग्रामीण नव उद्योजक /कृषी पदवीधारक /अस्तित्वात असलेली औजारे बँक (सेवा सुविधा केंद्र ) ............................... (इतर) |

**२. अर्जदार संस्थेचा पत्ता :**

| | | | |
|---|---|---|---|
| **ठिकाण** | | **गांव** | |
| **तालुका** | | **जिल्हा** | |
| **पिन** | | **फोन नं./मो.नं.** | |

**३. संस्थेचा तपशील/ अथवा ज्या व्यक्तीच्या बॅन्क खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधीकृत केले आहे अशा व्यक्तीचा तपशील.**

| | | | |
|---|---|---|---|
| **व्यक्तीचे/संस्थेचे नांव** | | | |
| **संस्थेशी संबंध** | | | |
| **ठिकाण** | | **गांव** | |
| **तालुका** | | **पिन** | |
| **जिल्हा** | | **फोन नं. /मो.नं** | |

| | | | |
|---|---|---|---|
| आधार क्रमांक | | खाते असलेल्या बॅन्केचे नाव | |
| आधार क्रमांक | | खाते असलेल्या बॅन्केचे नाव | |
| बॅन्क खाते क्रमांक | | बॅन्केचा IFSC कोड | |

४. अर्जदाराने/संस्थेने धारण केलेल्या शेतजमिनीचा 7/12 व 8-अ प्रमाणे तपशील:

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |

५ .. अनुदानावर खरेदी करावयाच्या औजार/ उपकरणाचा तपशील:

| अ. क्र. | खरेदी करावयाच्या ड्रोन व इतर उपकरणे नाव व तपशील | मॉडेल | उत्पादकाचे /कंपनीचे नांव | औजार/ यंत्राची किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| | **एकूण किंमत** | | | |

६.अर्जदार संस्था ही या पूर्वी लाभ घेतलेली औजारे बँक धारक (सेवा सुविधा केंद्र धारक )असल्यास त्या बाबत चा तपशील

| अ.क्र | संस्थेचे नाव | पत्ता | अनुदान घेण्यात आलेले वर्ष | संस्था सध्या कार्यरत आहे किंवा कसे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

७.अर्जदार कृषी पदवी धारक असल्यास त्या बाबतचा तपशील

| अ.क्र | अर्जदाराचे नाव | उत्तीर्ण वर्ष | विद्यापीठाचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

७.अर्जदार ग्रामीण नव उद्योजक असल्यास त्या बाबतचा तपशील

| अ.क्र | अर्जदाराचे नाव | शैक्षणिक पात्रता (किमान १० वी पास) | विद्यापीठाचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

टिप : ग्रामीण नव उद्योजक यांचेकडे Director General of Civil Aviation (DGCA) यांनी प्राधिकृत केलेल्या संस्थेकडील किंवा कोणत्याही अधिकृत रिमोट पायलट ट्रेनिंग संस्थेकडील रिमोट पायलट परवाना असणे आवश्यक आहे.तो सोबत जोडण्यात यावा.

**८ .मी याद्वारे घोषित करतो/करते की, उपरोक्त योजनेंतर्गत अनुदानावर उपरोक्त नमुद "ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र स्थापनेसाठी अर्थसहाय्य''स्थापनेसाठी पूर्वसंमती मिळणेबाबत विनंती आहे. खालील नमुद अटींची मला जाणिव असुन त्या मला मान्य आहेत.**

१. ड्रोन ची खरेदी किमतीची पुर्ण रक्कम भरुन खुल्या बाजारातुन ड्रोन व इतर उपकरणे ची खरेदी करण्यास संस्था तयार आहे.

२. **ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र** स्थापनेकरीता बॉन्ड पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

३.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या माफक भाडेतत्वावर **ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र** सेवा-सुविधा पुरविण्यास आमची तयारी आहे.

४. अनुदानाची रक्कम माझे आधार संलग्न बँन्क खात्यामध्ये थेट जमा केली जाईल याची मला कल्पना आहे, त्याकरीता मी माझे बँन्क खाते आधार क्रमांकाशी जोडलेले आहे.

५. मी ड्रोन व इतर उपकरणे खुल्या बाजारातुन माझ्या पसंतीने खरेदी करणार असल्याने ड्रोन व इतर उपकरणे गुणवत्तेची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे.

६.तसेच यापुर्वी मी उपरोक्त प्रस्तावासाठी किंवा त्याच्या काही भागासाठी कोणत्याही शासकीय/निमशासकीय यंत्रणेकडून अनुदान/आर्थिक मदत घेतलेली नाही.

७. ड्रोन व इतर उपकरणे खरेदीकरीता पुर्वसंमती मिळाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत औजारे/यंत्रांची खुल्या बाजारातुन खरेदी करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रदान केलेली पुर्वसंमती रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

८.मला ड्रोन व इतर उपकरणे खरेदीकरीता पुर्वसंमती मिळाल्यानंतर ड्रोन व इतर उपकरणे खुल्या बाजारातुन खरेदी करताना संस्थेच्या बॅन्क खात्यातुन इलेक्ट्रॉनिक पध्दतीने(आर.टी.जी.एस. ईत्यादी)/धनादेश/धनाकर्षाद्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

- ९. **ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र** -सेवा-सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक अनुभव, प्रशिक्षीत, अनुभवी व पुरेसे मनुष्यबळ असणे, यंत्रसामुग्री व उपकरणे सुरक्षीत व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक जागा व

शेडची व्यवस्था असणे बंधनकारक राहील. सर्व यंत्रसामुग्री व उपकरणे संबंधीतांनी माफक भाडे तत्वावर उपलब्ध करुन त्यांच्या सेवा शेतक-यांना वेळोवेळी पुरविणे बंधनकारक राहील.

११. संस्थेने **ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्र** सेवा-सुविधा शेतक-यांना पुरविल्याबाबत आवश्यक अभिलेख ठेवणे व त्याचा नियमीत अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत तपासणीच्या वेळी सर्व यंत्रसामुग्री/उपकरणे व अभिलेख सादर करणे बंधनकारक राहील.

१२. सदर कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणा-या यंत्रसामुग्री व उपकरणे यांची नियमीत देखभाल व दुरुस्ती करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारक संस्थेची राहील. संबंधीत सेवा-सुविधा केंद्रे व्यवस्थित चालविणे व वेळोवेळी त्यात सुधारणा करण्याची तयारी असणे आवश्यक राहील.

१३. Ministry of Civil Aviation ,CIB&RC यांचेकडील मार्गदर्शक सूचना प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

१४ .केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या SOP प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक राहील.

**९.मी अर्जासोबत पुढील कागदपत्रांच्या <u>स्वयंसाक्षांकित</u> प्रती जोडत आहे.(लागु असलेल्या ठीकाणी √ खुण करावी.)**

१. आधार कार्ड/फोटो असलेल्या ओळखपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत.

२. खरेदी करावयाच्या ड्रोन चे अधिकृत विक्रेत्याचे दरपत्रक/कोटेशन.

३. बँक पासबुकाच्या पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत / रद्द केलेला धनादेश.

४. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

५. संस्थेशी संबंधीत व्यक्तीच्या बॅन्क खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधीकृत केले असल्यास प्राधीकृत केल्याचे पत्र.

६. अधिकृत रिमोट पायलट ट्रेनिंग संस्थेकडील प्रशिक्षण घेतलेल्या रिमोट पायलट परवाना धारक चालकाचे नाव व तपशील (कागदपत्रे जोडण्यात यावी)

**ठिकाण:** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**दिनांक:** **नांव-** ------------------------------